# व्यक्तिमत्व विकास योजना

## १. प्रस्तावना:

केवळ पुस्तकी व बौध्दिक शिक्षणावर विद्यापीठामध्ये भर न देता समाजसेवा व शिक्षणेत्तर उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करुन त्यांचा व्यक्तिमत्व विकास साधता यावा. त्याच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ शिक्षणापासून वंचित असलेल्या अन्य घटकांनाही मिळावा तसेच अधिक संस्कारक्षम, सक्षम, ध्येयवादी, सेवाभावी व जीवनमूल्यांना जोपासणारी विद्यार्थी पिढी निर्माण व्हावी यासाठी ही योजना आहे.

## २. उद्दिष्टे :

१. विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करणे.
२. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
३. जीवनमूल्ये रुजविण्याचा प्रयत्न करणे.
४. विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी आरोग्य, कयदे, संस्कृती, संगणक, माहिती तंत्रज्ञान, कौशल्य विकास कार्यक्रमाद्वारे मार्गदर्शन करणे.
५. शिक्षणेत्तर कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.
६. स्वयंरोजगाराच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

## ३. योजनेसाठी पात्रता :

या योजनेमध्ये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमधून उच्च शिक्षण घेत असलेले विद्यार्थी सहभागी होवू शकतात. सदर योजना राबविण्यासाठी महाविद्यालयांना विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाकडून मान्यता घ्यावी लागेल.

## ४. योजनेसाठी अनूदान :

महाविद्यालयाने पाठविलेल्या प्रस्तावास विद्यापीठाकडून योजनेची मान्यता घेवून अंमलबजावणी करावी लागेल. या योजनेकरीता जास्तीत जास्त रु. १०,०००/— अनुदान देय राहील.

## ५. अर्ज करण्याची पध्दत :

या योजनेच्या मान्यताप्राप्तीसाठी महाविद्यालयानी सोबत जोडलेल्या नमुन्यातील अर्जासह प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा. सदरचा प्रस्ताव मा. संचालक विद्यार्थी कल्याण, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयाकडे पाठवावा. प्रस्तावासोबत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करावी. प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात ३० सप्टेंबर ही अंतिम मुदत असेल. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना मान्यता देता येणार नाही.

## ६. योजनेसाठी मान्यता :

विद्यार्थी कल्याण विभागाद्वारा प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावाची छाननी करुन मार्गदर्शक तत्वांच्या आधारे मा. कुलगुरुंनी मान्यता दिलेले प्रस्ताव या योजनेसाठी पात्र ठरतील. अपूर्ण अवस्थेत असलेल्या प्राप्त प्रस्तावांना मान्यता दिली जाणार नाही.

## ७. योजनेसाठी कार्यवाही :

सदर योजनेची कार्यवाही महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण समितीमार्फत करण्यात येईल. या योजनेच्या माध्यमातून शिबीरे, चर्चासत्र, कार्यशाळा, कृतिसत्रे यांचे आयोजन करण्यात यावे. आरोग्य, शिक्षण, शारीरिक, मानसिक आरोग्याची माहिती, स्वंयरोजगाराची माहिती, व्यक्तिमत्व विकास, स्त्रीपुरुष समानता, योग शिक्षण, पर्यावरण जागृती, कौशल्य विकास, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी विषयांवर मार्गदर्शनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

## ८. आर्थिक तरतुद :

कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत संगणक जागृती, आय.सी.टी. जागृती कार्यशाळांचे महाविद्यालयाने आयोजन करावे अशी अपेक्षा आहे. या कार्यशाळेकरीता तज्ज्ञ मार्गदर्शक तयार करण्याकरीता प्रशिक्षकांचे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठ करील. एका महाविद्यालयातील दोन प्राध्यापकांना या कार्याशाळेमध्ये प्रशिक्षण घ्यावे लागेल.

विद्यार्थ्यांसाठी १ आठवडा कालावधीकरीता अनिवासी कार्यशाळा महाविद्यालयाने आयोजित करावी. यामध्ये एका तज्ज्ञ व्यक्तीचे मानधन जास्तीत जास्त रु. ३००/— देण्यात यावे. या योजनेंतर्गत महाविद्यालयास जास्तीत जास्त रु. १०,०००/— अनुदान देय राहील

कार्यशाळा आयोजनाकरीता किंवा उपक्रमांना संचालक विद्यार्थी कल्याण यांची मान्यता असणे आवश्यक आहे. सोबतच्या विहीत नमुन्यातील अर्जाद्वारे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असून मान्यता मिळाल्यानंतरच कार्यक्रमांचे आयोजन करावे. फेब्रुवारी महिन्या अखेरपर्यंत ही योजना राबविता येईल. कार्यक्रम आयोजनाकरीता आलेल्या खर्चाचा हिशेब सादर केल्यानंतरच धनादेशाद्वारे खर्चाची पूर्तता करण्यात येईल.

नियमावलीत योग्य ते बदल करण्याचे अधिकार विद्यार्थी कल्याण समितीला राहतील.

डॉ. एस. एम. रोकडे
संचालक विद्यार्थी कल्याण (प्र.) तथा
कुलसचिव (प्र.)

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

डॉ. एन. व्ही. कल्याणकर
कुलगुरु व अध्यक्ष

# विद्यार्थी कल्याण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
# व्यक्तिमत्व विकास योजना, २०  — २०  साठी प्रस्ताव

१. महाविद्यालयाचे नांव व पत्ता : ........................................................................................
........................................................................................................................
२. महाविद्यालयाचे स्थापनेचे वर्ष : ........................................................................................
३. प्राचार्यांचे नाव : ........................................................................................................
४. विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याचे नाव व मोबाईल क्र. : ..................................................
५. महाविद्यालयातील एकूण प्राध्यापकांची संख्या : ..........................................................
६. महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या : ....................................................................
७. महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या : .........................................................
८. व्यक्तिमत्व विकास योजनेसाठी सल्लागार उपसमिती सदस्यांची नांवे :
 १) ................................................ : प्राचार्य, पदसिध्द अध्यक्ष
 २) ................................................ : ..........................................................
 ३) ................................................ : ..........................................................
 ४) ................................................ : ..........................................................
 ५) ................................................ : ..........................................................
९. महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांसाठी कोणकोणते ज्ञानविस्तार कार्यक्रम राबिवले जातात ?
 १)..................................................................................................................
 २)..................................................................................................................
१०.चालु शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातर्फे कोणते उपक्रम सदर योजनेअंतर्गत राबविता येतील यासंबंधीच्या कार्यक्रमाचा आराखडा.
 १)..................................................................................................................
 २)..................................................................................................................

११.व्यक्तिमत्व विकास योजनेच्या वतीने कोणते उपक्रम घ्यावेत याविषयी सूचना :
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................

१२.खर्चाचे अंदाजपत्रक स्वतंत्ररित्या सादर करावे.

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी कल्याण अधिकारी<br>स्वाक्षरी व शिक्का | महाविद्यालयाचा<br>शिक्का | प्राचार्य<br>स्वाक्षरी व शिक्का |